# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**विषय क्रमांक :- ०१**

सभा क्र. १५ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक ०४/०९/२०१९

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०४/०९/२०१९ बुधवार रोजी दुपारी ०३.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ र्‍या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती श्री.जितेंद्र भगवानराव मराठे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

मा. श्री.जितेंद्र भगवानराव मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी

| | |
|---|---|
| बेंडाळे उज्वला मोहन | सनकत चेतन गणेश |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | पाटील प्रतिभा सुधिर |
| सोनवणे सुरेश माणिक | भंगाळे विष्णू रामदास |
| पोकळे दिलीप बबनराव | बरडे नितीन मनोहर |
| खडके सुनिल वामनराव | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |

सदर सभेस, आयुक्त सो श्री. उदय टेकाडे , उपायुक्त सो , श्री. मिनानाथ दंडवते , श्री.उत्कर्ष गुटे , अजित मुठे , मुख्लेखापरिक्षक श्री. संतोष वाहुळे व नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.

मा.सभापती :- नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

नगरसचिव :- सभेला सुरुवात करणेत येत आहे. आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य श्री . प्रविण रामदास कोल्हे यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो मा. सभापती महोदय यांनी मंजुर केलेला आहे . आजच्या स्थायी समिती सभेस सुरुवात करणेत येत आहे.

नगरसचिव:- विषय क्र. १) दि.२०/०७/२०१९ व दि.२९/०७/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे .

श्री.विष्णू भंगाळे :- आम्ही तटस्थ आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.२०/०७/२०१९ व दि.२९/०७/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- ०८ प्रतिकुल मते :- ००तटस्थ :- ०३**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

नगरसचिव:- विषय क्र. २) महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या २५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगाव शहर महानगरपालिका हद्दीत गोपाळपुरा नाला ते स्मशानभुमी (जुना नशिराबाद रोड) पर्यंत नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामी मक्तेदार सिध्दार्थ विनोदकुमार दधिच यांचे निविदा रक्कमेवर ०.०१% कमीचे दरानुसार रक्कम रु.१,१७,६७,९१३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सुनिल खडके :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे .

श्री. चेतन सनकत :- माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या 25 कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत गोपाळपुरा नाला ते स्मशानभुमी (जुना नशिराबाद रोड) पर्यंत नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामास महासभा ठराव क्रमांक 11 दि. 11/10/2018 अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीस मान्यते करीता शिफारस होणेकारीता मान्यता देण्यात आलेली आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस देवून उक्त प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-2016/प्र.क्रं. 171 (26)/नवि-16, मंत्रालय, मुंबई दि. 08/02/2019

अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.12/02/2019 च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.1283 सन 2018-19 मनपा च्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली दिलेल्या मुदतीत दि. 14/03/2019 पर्यंत 05 ई- निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. 05 मक्तेदारांचे उक्त कामाचे प्राप्त झालेले ई-निविदा कागदपत्रांचे छाननी केली असता सदर ई निविदा फोल्डर क्र.02 उघडण्यास पात्र असुन दोनच मक्तेदार असल्याने दरात तुलना होणार नसल्याने सदरील ई निविदा दुस-या वेळेस प्रसिध्द करण्यास आयुक्त, मनपा यांचे दि.31/05/2019 च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.1345 सन 2018-19 मनपा च्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली. दिलेल्या मुदतीत दि. 18/06/2019 पर्यंत 03 ई- निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. तसा रिपोर्ट Einternet वरुन दि. 19/06/2019 रोजी घेण्यात आला. तसेच दि.20/06/2019 रोजी घेण्यात आलेल्या रिपोर्टानुसार 02 ई-निविदा आल्याचे नमुद आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-2017/प्र.क्र.8/इमा-2 दि.29/01/2019 अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. परंतु सदर कामाची ई निविदा दुस-या वेळेस मागविण्यात आली असल्याने त्यात 02 ई निविदा आलेल्या आहे. मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. 11769090/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| 1 | श्री श्री इन्फ्रास्ट्रक्च प्रा.लि. | निविदा रक्कमेवर 0.99% जास्तीचे दराने | 11885604/- |
| 2 | सिध्दार्थ विनोदकुमार दधिच | निविदा रक्कमेपेक्षा 0.01% कमीचे दराने | 11767913/- |

तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार सिध्दार्थ विनोदकुमार दधिच यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा 0.01% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु 11767913/-मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु. 11767913/- मात्र मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत 25 कोटी निधीतुन खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार सिध्दार्थ विनोदकुमार दधिच यांचे निविदा रक्कमेपेक्षा 0.01% कमीचे दर स्विकृत करुन महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम 73 (क) मधील तरतुदीनुसार रक्कम रु.11767913/- मात्रची संविदा करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** ११ **प्रतिकुल मते :-** ००

**सुचक :-** **खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :-** **सनकत चेतन गणेश**

नगरसचिव:- विषय क्र. ३) महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१० मधील पिंप्राळा गट नं.२०४/२ मध्ये ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व गेट बसविणे व प्रभाग क्र.१० मधील पिंप्राळा गट नं.१९८,१९९ मधील विरसावरकर नगरमध्ये आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार योगराज गणेश पाटील यांचे निविदा रक्कमेवर ०.९९% कमीचे दरानुसार रक्कम रु.३१,०७,२४२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सुरेश सोनवणे :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या 5 कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.10 मधील पिंप्राळा गट नं.204/2 मध्ये ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व गेट बसविणे व प्रभाग क्र.10 मधील पिंप्राळा गट नं.198,199 मधील विरसावरकर नगरमध्ये आर.सी.सी.गटार बांधणे कामास महासभा ठराव क्रमांक 59 दि. 07/12/2018 अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीस मान्यते करीता शिफारस होणेकारीता मान्यता देण्यात आलेली आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस देवून उक्त प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-2018/प्र.क्रं. 170 अ (27)/नवि-16, मंत्रालय, मुंबई दि. 28/02/2019 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.02/03/2019 च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.1309 सन 2018-19 मनपा च्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली. दिलेल्या मुदतीत दि. 26/03/2019

Municipal Corporation जळगांव महानगर जळ

पर्यंत 04 ई- निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. उक्त कामांचे 04 मक्तेदाराचे प्राप्त झालेले ई-निविदा कागदपत्रांची छाननी केली असता मक्तेदार अतुल पाटील यांनी पी एफ रजिस्टर सादर न केल्याने त्याची ई निविदा रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरीत 3 ई निविदा धारकांचे दराबाबतचे फोल्डर नं. 2 दि.23/05/2019 रोजी ओपन करुन त्यात मक्तेदार पदमालय कंन्स्ट्रकशन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा 16.02% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. परंतु मक्तेदार पदमालय कंन्स्ट्रकशन यांनी निविदे सोबत 7.02% परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणुन रक्कम रु. 220309/- मात्रचा डि.डि.निविदा अटीशर्ती नुसार स्कॅन करुन निविदे सोबत सादर करणे आवश्यक होते. मक्तेदार यांनी सदरचा डि.डि.सादर केलेला नसल्याने त्यांनी सादर केलेली ई निविदा रद्द करण्यात आली. सदरची ई निविदा रद्द झाल्यास उर्वरीत दोन ई निविदा सोबत दरा बाबत तुलना करता येणार नसल्याने उक्त कामाची फेर ई निविदा प्रसिध्द करणे आवश्यक होते परंतु दि.10/03/2019 पासुन लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचार संहिता लागु असल्याने उक्त कामाची फेर ई निविदा मनपा संकेत स्थळावर प्रसिध्द करणे कामी शहर अभियंता मनपा यांचे दि. 24/05/2019 च्या मान्यते अन्वये उक्त कामाची फेर ई निविदा सुचना क्रं.1354 सन 2019-20 मनपा च्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली. दिलेल्या मुदतीत दि. 25/06/2019 पर्यंत 03 ई- निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. उक्त मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. 3138311/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| 1 | विलास प्रभाकर पाटील | निविदा रक्कमेपेक्षा 0.50% कमीचे दराने | 3122619/- |
| 2 | पंकज गजानन वाघ | निविदा रक्कमेइतकेच | 3138311/- |
| 3 | योगराज गणेश पाटील | निविदा रक्कमेपेक्षा 0.99% कमीचे दराने | 3107242/- |

तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार योगराज गणेश पाटील यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा 0.99% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु 3107242/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु. 3107242/- मात्र मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत 5 कोटी निधीतुन खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार योगराज गणेश पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा 0.99% कमीचे दर स्विकृत करुन महाराष्ट्र महापालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73 (क) नसार रक्कम रु.3107242/- मात्राची संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सोनवणे सुरेश माणिक**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

नगरसचिव:- विषय क्रं. ४) जळगांव शहर महानगरपालिकेच्या मुळ व वाढीव हद्दीचा एकत्रित विकास आराखडा सुधारीत करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २५ अन्वये विद्यमान जमिन वापर (Existing Land Use Map) नकाशा भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधारे तयार करणे, तसेच नगररचना विभागास कलम २६ ते ३० नुसार नकाशे संगणकीकृत करणेसाठी सहकार्य करणे व विद्यमान जमिन वापराचे तसेच प्रस्तावित वापराचे क्षेत्रफळ तपशिल सादर करणेकामी मक्तेदार झेनोलीथ जियो सर्व्हीसेस पूणे यांच्या रु.४६००/- प्रती हेक्टर दरास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.सुरेश सोनवणे :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

श्री.विष्णू भंगाळे :- तटस्थ आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या मुळ व वाढीव हद्दीचा एकत्रित विकास आराखडा सुधारीत करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २५ अन्वये विद्यमान जमिन वापर (Existing Land Use Map) नकाशा भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधारे तयार करणे, तसेच नगररचना विभागास कलम २६ ते ३० नुसार नकाशे संगणकीकृत करणेसाठी सहकार्य करणे व विद्यमान जमिन वापराचे तसेच प्रस्तावित वापराचे क्षेत्रफळ तपशिल सादर करणेकामी म.न.पा. संकेत स्थळावर ई-निविदा क्र.1341 दि.28/05/2019 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती त्यानुसार एकुण 4 निविदा संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या होत्या प्राप्त निविदा धारकांच्या कागदपत्रांची छाननी केली असता 02 निविदाकार अपात्र ठरले असुन उर्वरीत 02 पात्र निविदा कारांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

of the City of Jalgaon शहर ...लिका ...गांव

| अ.क्र. | निविदा काराचे नाव | सादर केलेले दर प्रति हेक्टर |
|---|---|---|
| 01 | मोनार्च सर्व्हेअर्स अण्ड इंजीनीअरींग कन्सल्टंट प्रा.लि.पुणे | रु.4999/- प्रती हेक्टर (सर्व करांसहीत) |
| 02 | झेनोलीथ जियो सर्व्हीसेस पुणे | रु.4850/- प्रती हेक्टर (सर्व करांसहीत) |

तुलनात्मक तक्ता पहाता नविदाकार झेनोलीथ जियो सर्व्हीसेस पुणे यांचे दर तुलनेने कमी प्राप्त झालेले होते तथापि सदर निविदाधारकांना तडजोडीसाठी बोलविण्यात आलेले होते त्यानुसार निविदा धारक झेनोलीथ जियो सर्व्हीसेस पुणे यांनी रु.4600/- प्रती हेक्टर दराने काम करण्याची लेखी तयारी दर्शविलेली असल्याने जळगांव शहर महानगरपालिकेच्या मुळ व वाढीव हद्दीचा एकत्रित विकास आराखडा सुधारीत करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २५ अन्वये विद्यमान जमिन वापर (Existing Land Use Map) नकाशा भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधारे तयार करणे, तसेच नगररचना विभागास कलम 26 ते 30 नुसार नकाशे संगणकीकृत करणेसाठी सहकार्य करणे व विद्यमान जमिन वापराचे तसेच प्रस्तावित वापराचे क्षेत्रफळ तपशिल सादर करणेकामी मक्तेदार झेनोलीथ जियो सर्व्हीसेस पुणे यांचे वाटाघाटी अंती आलेले दर रक्कम रु.4600/- प्रती हेक्टर दरा प्रमाणे मनपा चे एकुण क्षेत्र (मुळ हद्द वाढीव हद्द 6878 हेक्टर) नुसार होणारी एकूण रक्कम रु. 3,16,38,800/- मात्र ला मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :-** ०८ **प्रतिकुल मते :- ००तटस्थ :- ०३**

**सुचक :- सोनवणे सुरेश माणिक**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

नगरसचिव:- विषय क्र. ५) ममुराबाद पुलाच्या पृष्ठ भागाचे लेव्हलपर्यंत नविन पाईप लाईन टाकणे कामी मनपा अधिनियमातील अनुसूची (ड) प्रकरण ५ (२) (२) नुसार रक्कम रु.३,१४,४३९/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.सुरेश सोनवणे :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

श्री.दिलीप पोकळे :- अनुमोदन आहे.

अड .शुचिता हाडा :- सभापती महोदय डॉकेट मध्ये जो प्रस्तावाचा विषय म्हंटलेला आहे की अमृत योजनेअंतर्गत ममुराबाद पुलाजवळ पाईपलाईन टाकणेबाबत असा उल्लेख केलेला आहे ती दुरूस्ती करण्यात यावी कारण त्याचा काही संबंध नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, ममुराबाद पुलावर अस्तित्वात असलेली ३०० मीमी सी.आय. पाईप लाईन नाल्याच्या प्रवाहात येत असल्याने सदरची पाईपलाईन काढुन पुलाच्या पृष्ठ भागाचे स्लॅब लेव्हलपर्यंत नविन पाईपलाईन टाकणे आवश्यक आहे. पुलाचे बांधकाम पुर्णत्वास येण्यापुर्वी कामाची निकड विचारात घेता तात्काळ नविन पाईपलाईन टाकणे आवश्यक होते. जुनी पाईपलाईन काढले नंतर चौघुले प्लॉट परिसरातील नागरीकांचा पाण्याचा प्रश्न तातडीने निकाली काढणे कामी पुलाच्या स्लॅब मधुन काढण्यात आलेल्या ब्रॅकेटवर लोखंडी पिंजरा तयार करुन त्यावर ३१५ मीमी व्यासाची एच.डी.पी.ई. पाईपलाईन टाकणेचे तातडीने काम अमृत योजनेचे मंजुर मक्तेदार जैन इरिगेशन सिस्टीम यांचेकडुन अंदाजित रक्कमे प्रमाणे विना निविदा करुन घेण्यात आलेले आहे. या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.३,१४,४३९/- मात्रला तांत्रिक मान्यता मिळालेली असल्याने कामाची निकड लक्षात घेता मे.जैन इरिगेशन सिस्टीम यांचेकडुन अंदाजित रक्कमे प्रमाणे विना निविदा काम करुन घेतलेले असल्याने सदरचे कामी आलेला खर्च रक्कम रु.३,१४,४३९/- मात्र ला मनपा अधिनियमाचे अनुसूची (ड) प्रकरण ५ (२)(२) नुसार कार्योत्तर मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** ११ **प्रतिकुल मते :-** ००

**सुचक :- सोनवणे सुरेश माणिक**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

Municipal Corporation Of जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

नगरसचिव:- विषय क्र. ६) कै.नानीबाई सुरजमल अग्रवाल दवाखान्याच्या मागील बाजुस असलेले प्रभाग समिती क्र.२ चे कार्यालयाची जागा डायग्नॉस्टीक सेंटरसाठी ओम साई ग्रामीण विकास प्रतिष्ठान या संस्थेस Public Private Partnership (PPP) तत्वावर देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.विष्णू भंगाळे :- तटस्थ आहोत.

श्री.रियाज बागवान :- तटस्थ आहोत .

श्री.विष्णू भंगाळे :- नगरसचिव साहेब प्रत्येक विषयाबाबत आम्हाला विचारून घेत जा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, कै.नानीबाई सुरजमल अग्रवाल दवाखान्याच्या मागील बाजुस असलेले प्रभाग समिती क्र.२ ची कार्यालयीन जागा डायग्नोस्टीक सेंटरसाठी देणेबाबत ई-निविदा प्रसिध्द करुन नोंदणीकृत संस्था, ट्रस्ट, अशासकीय सेवाभावी संस्था (NGOs) यांचेकडून स्थायी समिती ठराव क्र.१३६ दि.६/०७/२०१९ व दुरुस्ती ठराव क्र.१४३ दि.२९/०७/२०१९ अन्वये ई-निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार तीन निविदाधारकांचे लिफाफा क्र.१ उघडण्यात आले असून त्या संस्था पुढीलप्रमाणे आहेत. १) ओम साई ग्रामीण विकास प्रतिष्ठान २) प्रवर्तिनी भारतमाता पुज्य प्रमोदसुधाजी मा.सा.चॅरीटेबल ट्रस्ट ३) एस एम बी टी सेवाभावी ट्रस्ट. तीनही निविदा धारकांचा तुलनात्मक तक्ता पाहता मुल्यांकन निकषानुसार ओम साई ग्रामीण विकास प्रतिष्ठान या संस्थेस सर्वाधिक ७५ गुण असल्याने त्यांचे प्रस्तावाचे सादरीकरण करण्यात आले. सादरीकरणात त्यांना १२ गुण मिळालेले असुन ७५+१२ असे एकुण सर्वाधिक ८७ गुण मिळाले त्यानुसार कै.नानीबाई सुरजमल अग्रवाल दवाखान्याच्या मागील बाजुस असलेले प्रभाग समिती क्र.२ चे कार्यालयाची जागा डायग्नोस्टीक सेंटरसाठी ओम साई ग्रामीण विकास प्रतिष्ठान या संस्थेस Public Private Partnership (PPP) तत्वावर तीस वर्षाकरीता निविदेमधील नियम व अटी शर्तीसह देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- ०८ प्रतिकुल मते :- ०० तटस्थ :- ०३**

**सुचक :- सोनवणे सुरेश माणिक**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

नगरसचिव:- विषय क्र. ७) ई-निविदा सुचना क्र.१३४४ स्वच्छ महाराष्ट्र अभियान घनकचरा व्यवस्थापनांतर्गत आव्हाणे शिवारातील लँडफील साईटवर पुर्वीपासुन साठवलेल्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने बायोमायनिंग (Bio-Mining) प्रक्रियेव्दारे कचऱ्याचे पुनरुस्थान (Reclamation) करुन निरोपयोगी कचऱ्याची विल्हेवाट लावणे कामी L1 निविदाकार Global Waste Management Cell Pvt.Ltd. यांनी दिलेले दर रक्कम रु.359/- per cum (१५.७२% below) सर्वात कमीचे प्राप्त दर स्विकृत करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

सौ.उज्वला बेंडाळे :- सभापती महोदय व आयुक्त साहेब मागील जे टेंडर झालेले आहे १५ तारखेला सभापतींनी घेतलेल्या बैठकीमध्ये त्यांच्याकडे काही तक्रारी आलेल्या होत्या त्या अनुषंगाने त्यांनी पत्र पाठविलेले आहे त्यांनी अटींचा भंग केलेला आहे तिथे त्यांनी काम पुर्ण केलेले नाही त्यामुळे याची चौकशी करून त्यानंतर याला मंजुरी देण्यात यावी आणि स्वच्छ महाराष्ट्र अभियान समिती तर साहेब आपणच या समितीवर होतात तेव्हा आपणस हे पत्र दिलेले आहे १३ नोव्हेंबर २०१८ ला दिलेले आहे की जर काम व्यवस्थित पणे केले गेले नाही नागरी स्थानिक स्वराज्य संस्था ची अंदाजित जमीन पुन्हा प्राप्त करण्याकरीता अपयशी ठरले तर संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व संबंधित अधिकारी , पदाधिकारी , कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल . जर भविष्यात यांनी काम केले नाही तर मग याला जबाबदार कोण आहे आणि जर चौकशी करायची आहे तर मग अडचण ही आहे की हा विषय या ठिकाणी मंजुर साठी यायलाच नको होता चौकशी झाली असती तर आम्हाला मान्य करण्यास आम्हाला काही अडचण नव्हती व याची चौकशी करण्यात यावी आणि त्यानंतरच हा विषय घेण्यात यावा सध्या स्थगित ठेवण्यात यावा मागील काही दिवसांमध्ये ज्या घडामोडी झालेल्या आहेत त्यामुळे आपण सतर्क राहणे आवश्यक आहे त्यामध्ये अधिकारी , कर्मचारी आहेत आणि आपणच हे स्वतः दिलेले आहे त्यामुळे याची आपल्याला पुर्णपणे कल्पना असेल त्यामुळे आपण याची पुर्ण चौकशी करावी व त्यानंतर हा विषय ठेवण्यात यावा.

मा.आयुक्त :- मा.सभापती महोदय आणि उपस्थिती सर्व सन्मा.सदस्य नगररचना व्यवस्थापना दिन २०१६ हे अंमलात येऊन जवळपास अडीच ते तीन वर्षाचा कालावधी होत आहे या मध्ये प्रत्येक ऍक्टीव्हीटी करण्यासाठी मुदत दिलेली आहे हे करत असतांना राज्य शासन व केंद्र शासनाला असे लक्षात आले की याला नुसती मुदत देऊन उपयोग नाही तर त्यासाठी निधीसुध्दा उपलब्ध करून दिला पाहीजे त्यामध्ये जुना म्हणजे ५० वर्षाचा जो काही कचरा आहे तो मोठया प्रमाणावर कचरा डेपोवर साठवुन आहे आणि त्यामुळे त्याभागातील प्रदुषण वाढतय काही ठिकाणी शहरात असे लक्षात

The City Of Jalgaon शहर ... महानगरपालिका ... जळगांव

आले की ४० ते ५० फुटाचे डोंगर त्या ठिकाणी होते आणि दररोज येणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रीया करण्यासाठी सुध्दा जागा नाही त्यामुळे राज्य शासनाने केंद्र शासनाकडुन वेगवेगळया संस्थांकडुन डिपीआर तयार करून घेतले आणि त्या डिपीआर मध्ये कचऱ्याचे कलेक्शन , ट्रान्पोर्ट टेशन व विकेंद्रीत प्रक्रीया आणि जुन्या कचऱ्यावरचे बायोमायनिंग असे वेगवेगळे प्रकार मंजुर केले बायोमायनिंग म्हणजे काय हा विषय समजुन घेणे आवश्यक आहे बायोमायनिंग म्हणजे जुन्या कचऱ्यामधुन जे काही कंपोस्ट आपल्याला प्राप्त करता येवु शकेल ते आपण प्राप्त करून घेणे आणि जो उर्वरीत आहे तो डिस्पोज करणे हे करत असतांना आपल्याला पुर्ण त्या कचरा डेपोवर किंवा प्रक्रीया केंद्रावर कमीत कमी ८० टक्के जागा रिकव्हरीला त्याठिकाणी पाहीजे प्रत्येक शहाराचे प्रश्न वेगवेगळे असतात आणि काही ठिकाणच्या ठराविक अडचण सुध्दा वेगळया असतात आणि सुदैवाने हे जे टेंडर आलेले आहे एल 1 जे निविदाकार आहे ज्या नगरपालिकेचा आपण उल्लेख केला त्या दोन्ही नगरपालिकेत मी 3-3 वर्ष मुख्याधिकारी म्हणून काम केलेले आहे पंढरपुर नगरपालिकेत बायोमायनिंग चे काम अतिशय चांगल्या पध्दतीने काम झाले अश्या प्रकारचे प्रेझेंटेशन आपल्या हायपॉवर कमिटीची मिटींग होती राज्य पातळीवर तर त्या ठिकाणी मा.मुख्य सचिवांच्या समोर पंढरपुर चे प्रेंझेटेशन झालेले होते तेथे 3 ते 4 विभागाचे सचिव व नगरविकास विभागाचे सचिव मुख्यसचिवांसह त्या सगळयांनी ते अप्रेसिएट केले होते दुसरा जो भाग आहे कराड नगरपालिकेचा आपल्या महाराष्ट्रामध्ये भुयारी गटार योजना असलेल्या काही ज्या बोटावर मोजण्याईतक्या नगरपालिका आहेत त्यामध्ये 70 च्या आसपास भुयारी गटार योजना होती तर त्याठिकाणी 70 ची योजना असल्यामुळे ऑक्सीनेशन पॉड म्हणजे संपुर्ण हयाचावर प्रक्रीया झाल्यानंतर पाणी साठविण्याची व्यवस्था त्या ऑक्सीनेशन पॉड च्या शेजारीच हा कचरा डेपो होता तर त्याठिकाणी त्याचे संपुर्ण लिकेज हे त्या कचऱ्यामध्ये केलेले होते त्यामुळे त्याठिकाणी पुर्णपणे बायोमायनिंग चे काम करता आले नाही म्हणजे तो दोष त्या एजन्सीचाही नाही व त्या नगरपरिषदेचाही नाही पण मात्र वस्तुस्थिती अशी आहे पण आपल्याला एनजीपीने काही स्पेसिफीक वॉर्ड दिलेले आहेत आणि त्यामध्ये ठाराविक कालावधीमध्ये एक कमिटी येवुन त्याची पाहणी करेल गेल्या दोन महिन्यापुर्वी नाशिकयेथील कुलकर्णी साहेब आले होते तर त्यावेळेला त्यांनी तात्काळ हे काम तुम्ही सुरू करा अश्या सुचना दिलेल्या होत्या हया टेंडरमध्ये कित्येक दिवसांपासुन काही क्युरीज होत्या त्यामुळे टेंडर फायनलाईज होत नव्हते किंवा क्लोज होत नव्हते सुदैवाने आता जे काही टेंडर आलेले म्हणजे एल -1 आलेले आहे आणि आपल्या निर्धारीत दरापेक्षा कमी आलेले आहे आपण आत्ता जे काही त्यांच्यामध्ये उल्लेख केलेला आहे ते वातावरण मी समजु शकतो कुठल्याही वैधानिक संस्थेला किंवा पदाधिकारींना , अधिकाऱ्याला त्यांची जबाबदारी पार पाडत असतांना त्यांनी ती दक्ष आणि चोखपणे पार पाडली पाहीजे पण त्याच बाजुला आपण जर निर्णय घ्यायचे टाळले तर ते सुध्दा अडचणीचे होवुन जाते असे म्हटले जाते की जो कधी कामच करत नाही तो कधीच चुकत नाही नो वर्क नो मिस्टेक त्यामुळे या सगळयांचा व एनजीटी च्या ऑर्डर चा विचार करता माझी या समितीला विनंती आहे की हे टेंडर आपण मान्य करावे .

सौ.उज्वला बेंडाळे :- हा विषय आम्ही नाकारत नाहीये पण आम्हाला अभ्यास करायला वेळ पाहीजे आहे .

मा.आयुक्त :- नाही तसे नाही विषय नाकारायचा, रदद करायचा किंवा तहकुब ठेवायचा हा अधिकार आपल्याला आहे मी फक्त पॉलीपोक करून घेतोय दुसऱ्या एका प्रकारणामध्ये मलावाटते काही अकाऊटींगच्या संदर्भात दोन वेळा अकाऊंट सुध्दा सिझ झालेले आहे उदया आपण काही निर्णय घेतला नाही ठिक आहे मला काही फरक पडणार नाही फक्त मला ते आपल्याकडुन अप्रुव्हल करावे लागेल की हे-हे काम केले की झाले बाकी काही नाही.

मा.सभापती :- आपण हा विषय नंतर घेवु .

मा.आयुक्त :- तसे नाही तहकुब ठेवायचा किंवा रदद करायचा हा आपला विषय आहे काही वेळेस कायहोते की कोणी पत्र देतात त्याला पुरावे असले तर आपण समजु शकतो टेंडर प्रक्रीयेत खोट आणण्यासाठी व निर्णय प्रक्रीयेत निर्णय घेता येवु नये अशी काही परिस्थिती येते अशी मला शंका आहे तरी आपल्याकडुन त्याची व्यवस्थित शहानिशा करावी .

सौ.उज्वला बेंडाळे :- या प्रकरणाची शहानिशा करण्यात यावी .

मा.सभापती :- आयुक्त साहेब या प्रकरणाची दोन दिवसांत शहानिशा करावी.

मा.आयुक्त :- नाही दोन दिवसांत कशी शहानिशा करणार दोन दिवसांत प्रकरणाची शहानिशा होवुच शकत नाही नाही ना असे पत्र आलेले असतांना दोन दिवसांत शहानिशा करूच शकत नाही

मा.सभापती :- आपण प्रयत्न करून बघावे .

मा.आयुक्त :- नाही अशी पत्र आली तर आपण त्याची शहानिशा कशी करणार सिस्टिम मध्ये दाखवा मला .

मा.सभापती :- नाही करता येणार का ?

मा.आयुक्त :- आपल्या राज्यामध्ये 384 नगरपालिका आहेत प्रत्येक टेंडरच्या बाबतीत मध्ये काहीतरी आले तर आपण 384 ची N O C घेणार आहे का ? मागच्या वर्षी तसे झाले आहे काही नगरपालिकेच्या ठेक्याच्या बाबतीत असे झालेले आहे .

Municipal Corporation Of
जळगांव श
महानगरपा
जळग

श्री.सुनिल खडके :- सर एक विनंती अशी करतो की हा विषय पुढील एक दोन मिटींग पर्यंत तहकुब करूया कारण मागच्या ३१ तारखेला जे निर्णय झाले ठराव झाले आहेत त्यामुळे काही जण विचलीत झालेले आहेत जळगांव महानगरपालिकेच्या दृष्टीने मोठी घटना आपल्याला घ्यावी लागली तर तो विचार करून निर्णय घ्यावा.

मा.आयुक्त :- फक्त आपण दुसरी बाजु लक्षात घ्यायला पाहीजे की आचारसंहिता सुरू होणार आणि आचारसंहिता पुर्वी हे काम सुरू होणे अपेक्षित आहे .राज्य शासनाने आपल्याला डिपीआर देवुन 2 ते 3 वर्ष लागलेले आहे. काय तारीख आहे त्याची .

मा.उपायुक्त (आरोग्य) :- दिनांक 01/03/2017ला मिळालेले आहे

मा.आयुक्त :- नाही माझे काही म्हणणे नाही फक्त माझे आजचे सगळे बोलणे याचा वर्ड टु वर्ड प्रोसेडिंग मध्ये यायला पाहीजे अशी माझी विनंती आहे.

श्री.सुनिल खडके :- स्थगित ठेवा.

मा.सभापती :- आपण जर याचे निरीक्षण केले तर

मा.आयुक्त :- नाही जे सगळ केलेले आहे ते निरिक्षण केलेलेच असते तसेच प्रत्येक याला वेगवेगळा जीआर नसतो व शहानिशा कशी करावी ही तुमच्या लेव्हला करावी .

श्री.विष्णू भंगाळे :- तुम्ही काय करताय सभापती महोदय हा निर्णय तुम्ही घ्यायचा आहे.

मा.सभापती :- हा विषय स्थगित ठेवुन पुढील मिटींग मध्ये घ्यायचा आहे.

श्री.विष्णू भंगाळे :- ठिक आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव क्रणेत येत आहे की, प्रशासनाकडुन आलेला प्रस्तावा संदर्भात सदस्यांना अभ्यास करणे आवश्यक असल्यामुळे सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवणेत यावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

नगरसचिव:- विषय क्र. ८) महानगरपालिका हद्दीतील संपुर्ण मालमत्ताचे (जमिन व इमारती) जी.आय.एस.प्रणालीव्दारे सर्वेक्षण करणे, नंबरींग करणे, मोजमाप घेणे, संपुर्ण मालमत्तांचा डाटा संगणकीकृत करणे, मिळकत मुल्यांकन करणे (करमुल्य निर्धारण) व कर आकारणी करणे कामी स्थापत्य कंन्सलटंट,अमरावती या एजन्सीचे मालमत्ता सर्वेक्षणाचे देयक अदायगी मालमत्ता करापोटी मनपाला प्राप्त होणाऱ्या रकमेतून करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.चेतन सनकत :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

श्री.नितीन बरडे :- आम्ही तटस्थ आहोत .

श्री.विष्णू भंगाळे :- होवु शकते नाही काहीही करायला काय हरकत आहे .

मा.सभापती :- सर्व विषयांवर आपण तटस्थ आहात काय ?

श्री.विष्णू भंगाळे :- सर्व कोण म्हणतय शेवटी बहुमत आपल्याकडे आहे. मंजुर करणे आपल्या हातात आहे आम्ही आपल्या सोबत असो किंवा नसो विरोधी म्हणुन आमची ही काही भुमिका असली तर आम्ही नक्कीच बोलु आणि निदर्शनास आणुन देणेसाठी आम्ही त्याची शहानिशा करू ते आपल्याच हातात आहे जे काही निर्णय घ्यायचे असतील मंजुर करायचे असतील ते आपण करू शकतात .

मा.सभापती :- भाऊ तुमचा आवाज ऐकायचा होता आम्हाला

श्री.विष्णू भंगाळे :- शहरातील काही निर्णय आपण घेत असाल आणि आम्ही तटस्थ आहोत म्हणजे आम्ही विरोधी नाहीये व होकार पण नाहीये हे आपण समजु शकतात. जसे आता सुनिल भाऊ बोलेले की 31 तारखेला झालेली घटना शहराच्या विकासासाठी काही तांत्रिक अडचणी किंवा काही चुका झाल्या असतील काम केले आता आयुक्त साहेबांनी सांगीतल्या प्रमाणे काम करतांना चुक लक्षात येत नाही त्यामुळे त्या घटना घडतात त्यामुळे आपले काही सदस्य ज्येष्ठ काही ऐंशी वर्षाचेसुध्दा आहेत तेव्हापासुन ते आतापर्यंत मी त्यांच्या संपर्कात आहे आपण जे डोळयांनी पाहीले तरी विकासाच्या दृष्टीने जरी आपण निर्णयघेत असलो तरी आपण त्या गोष्टीला होकार दिला पाहीजे अशी भुमिका या सभागृहाची राहणार का? ज्या काही गोष्टी आपण घेतल्या त्यामध्ये जळगांव शहराच्या विकासाच्या दृष्टीनेच पाऊले उचललेली होती परंतु त्या अंगलट आल्या काही नक्कीच ती भुमिका घेतांना आम्ही सुध्दा विचार करून घेवु वयेणाऱ्या काळामध्ये कारण की आता लागलीच मिटींग आलेली आहे विषय सुध्दा आज दुपारपर्यंत मी तिकडुन आलो तर नक्कीच आपल्याला त्यावर विचार करता येईल आणि बहुमताने मागील काही विषय केलेलेच आहेत व विकासाला आमच्याकडुन अडवणुक होवु शकत नाही

the City of Jalgaon हर लिका ांव

उदया आपण 5 पट दंडावर जरी निर्णय घेतला तरी आमची काही हरकत नाही आम्ही तेथे सुध्दा तटस्थ आहोत आज जरी तुम्ही मार्केट चा निर्णय घेतला तरी आम्हाला काही हरकत नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील संपूर्ण घरपट्टी विभागाचा डाटा संगणकीकृत नसल्यामुळे बरेच मनुष्यबळ वापरावे लागत असे तसेच कामाचा वेग देखील कमी होता. करिता ई-निविदा प्रक्रियेअंती स्थापत्य कन्सलटन्ट,अमरावती यांना स्थायी समिती ठराव क्रं.५७७ दि.२७/१२/२०१६ अन्वये सदरचे काम देणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच करारनामा करुन संबंधितांना दि.०४/०१/२०१७ रोजी कार्यादेश प्रदान करण्यात आलेला आहे. प्रकरणी मंजूर करारनाम्यानुसार वार्षिक देखभालीसाठी प्रती मिळकत रु.८३/- दरानुसार सन २०१८-१९ व २०१९-२० साठी अन्युअल मेन्टेनेन्स करीता १,३०,०५८/- मिळकती विचारात घेऊन एकूण रु.१,०७,९४,८१४/- च्या खर्चास मान्यता घेण्यात आलेली होती. मात्र आयुक्त यांचे आदेशाने सन २०१७-१८ पासूनच पूर्वीचा मागणी रजिष्टरचा डाटा संगणकीकृत करणेचे काम हाती घेण्यात आल्याने तसेच सन २०१७-१८ ची प्रभाग समिती क्र.०१ संगणकीकृत देयके तयार करणेत आल्याने सन २०१७-१८ पासून मक्तेदारास अन्युअल मेन्टेनेन्स चार्जेस देणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| :त्यानुसार सन २०१७-१८ साठी | | |
| प्रभाग समिती क्र.०१ २९४६५Xरु.८३ च्या ८०% ६६.४ = | १९५६४७६ | |
| प्रभाग समिती क्र.०२ २१७५०Xरु.८३ च्या ५०% ४१.५० = | ९०२६२५ | |
| प्रभाग समिती क्र.०३ २५०८०Xरु.८३ च्या ५०% ४१.५० = | १०४०८२० | |
| प्रभाग समिती क्र.०४ २०७१२Xरु.८३ च्या ५०% ४१.५० = | ८५९५४८ | |
| एकूण ९७,३४३Xरु.८३ प्रती मिळकत = | | ४७५९४६९ |
| | | |
| :त्यानुसार सन २०१८-१९ साठी | | |
| प्रभाग समिती क्र.०१ २९४६५Xरु.८३ च्या १००% ८३/- = | २४४५५९५ | |
| प्रभाग समिती क्र.०२ २१७५०Xरु.८३ च्या १००% ८३/- = | १८०५२५० | |
| प्रभाग समिती क्र.०३ २५०८०Xरु.८३ च्या १००% ८३/- = | २०८१६४० | |
| प्रभाग समिती क्र.०४ २०७१२Xरु.८३ च्या १००% ८३/- = | १७१९०९६ | |
| एकूण ९७,००७Xरु.८३ प्रती मिळकत = | | ८०५१५८१ |
| :त्यानुसार सन २०१७-१८ साठी | | |
| प्रभाग समिती क्र.०१ २९४६५Xरु.८३ च्या १००% ८३/- = | २४४५५९५ | |
| प्रभाग समिती क्र.०२ २१७५०Xरु.८३ च्या १००% ८३/- = | १८०५२५० | |
| प्रभाग समिती क्र.०३ २५०८०Xरु.८३ च्या १००% ८३/- = | २०८१६४० | |
| प्रभाग समिती क्र.०४ २०७१२Xरु.८३ च्या १००% ८३/- = | १७१९०९६ | |
| एकूण ९७,००७Xरु.८३ प्रती मिळकत = | | ८०५१५८१ |
| एकूण सन २०१७-१८ ते २०१९-२० करीता २५१३५७Xरु.८३/- प्रती मिळकत = | | २०८६२६३१ |

इतका खर्च अपेक्षित असून मंजूर दराच्या अनुषंगाने एकूण १,३०,०५८ मिळकती विचारात घेऊन रु.१,०७,९४,८१४/- च्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे तरी सदर रक्कम वजा जाता उर्वरित १,२१,२९९ परिमाणासाठी रक्कम रु.१,००,६७,८१७/- मात्रचे खर्चास व सदरची रक्कम ही मालमत्ता कराच्या उत्पन्नापोटी मिळणाऱ्या रक्कमेतून अदायगी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

Municipal Corporation Of the ... जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- ०८ प्रतिकुल मते :- ०० तटस्थ :- ०३**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- पाटील प्रतिभा सुधिर**

नगरसचिव:- विषय क्र. ९) आव्हाणे शिवार गट नं.८६४ येथे स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत मंजुर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची उभारणी करणे कामी लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी लि.औरंगाबाद यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३ नुसार निविदा स्विकारण्यास व त्या कामी येणारा रक्कम रु.१४,४४,३२,८३५/- खर्चास तसेच प्राप्त दरानुसार निविदा रकमेपेक्षा जादा होणारा खर्च रु.२,२९,५८,६२६/- स्वच्छ भारत अभियानाच्या १४ व्या वित्त आयोगातील निधीतुन खर्च करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.दिलीप पोकळे :- या विषया बाबत मला प्रशासनाकडुन थोडे मार्गदर्शन पाहीजे आहे याच्याबददल दोन टेंडर आले आहेत एक तांत्रिक लिफाफा कागदपत्रे नसल्यामुळे रदद आहे आणि दुसरे टेंडर आपण १८ टक्के जास्तीच्या दराने देत आहोत आता आपण १८ टक्के जास्तीच्या दराने आपण टेंडर देण्याचे अधिकार आपल्याला आहेत का ?

मा.सभापती :- माहिती काय हवी आहे तुम्हाला ?

श्री.दिलीप पोकळे :- दोन विषय आहेत मला एकच माहिती पाहीजे आहे की आपण १८ टक्के जास्तीने देत आहे आणि एक तांत्रिक बाबीमुळे रदद झालेले आहे. एकच टेंडर ओपन झालेले आहे आणि ते टेंडर आपण जास्तीच्या दराने देत आहे अश्यावेळी जस्तीच्या दराने म्हणजे २.५ कोटी रूपयांचे आहे ते टेंडर आहे तर ते टेंडर मंजुर करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत का? या विषयी मला मार्गदशर्न मिळावे आणि याच विषयामध्ये महानगरपालिकेमध्ये दोन वर्षापुर्वी माहिती अधिकार अन्वये अर्ज दिलेला होता मा महासभेने यांनी त्याला मंजुरी दिली व स्वखर्चाने हा प्रकल्प उभा करण्यात येईल.

मा.आयुक्त :- आत्ता सभापती महोदय म्हटले की आपण करत आहोत पण आपल्याकडे एखादी संस्था असेल की ती स्वखर्चाने सुरू करेल त्याच्याकडुन करून घेवु कशाला एवढे 14 कोटी रूपये वाया घालवायचे .

श्री.दिलीप पोकळे :- नाही मी तसे नाही म्हणत आहे मा.आयुक्त साहेबांनी तो प्रस्ताव मंत्रालयाकडे पाठविलेला आहे त्या प्रस्तावाचे काय झाले ?

मा.आयुक्त :- त्यावर काही पाठपुरावा झाला की नाही हा विषय वेगळा आहे. आता असा प्रस्ताव आहे हे तुम्ही मला आज दाखवत आहात .

श्री.दिलीप पोकळे :- याबाबतीत पुर्ण फाईल तयार आहे .

मा.आयुक्त :- जर खरच असे काही असेल तर आपण त्याचाच उपयोग करू ना मग आपण कशाला टेंडर काढले असते कारण १४ कोटींचा विषय आहे .

मा.सभापती :- त्यांचे म्हणणे असे आहे की आपण जो प्रस्ताव पाठविलेला होता त्याबाबतची माहिती त्यांना सांगा.

उदय पाटील :- सर मागे आपल्याला एक पत्र आलेले होते की घनकचराप्रकल्प आम्हाला चालवायला दयावे तर तो प्रस्ताव तत्कालीन मा.महापौर यांनी मा.महासभेपुढे ठेवला होता व महासभेने त्याला मान्यता दिली होती परंतु शासनाच्या परवानगीच्या अटीवर त्याला मान्यता दिली होती आणि सर शासनाची मान्यता त्याला मिळालेली नाहीये त्यामध्ये दोन अडचणी होत्या जर आपल्याला एखादे टेंडर चे काम करायचे आहे जरी ते BOT तत्वावर करायचे असेल तरी आपण जाहीर निविदाद्वारे तशी सुचना आपण दयायला पाहीजे होती आपण तसा ठराव करून तो शासनाकडे पाठविला होता मी स्वतः नगरसचिव साहेबांशी बोललो होतो ते म्हणाले होते की तुम्ही असा ठराव करून पाठवु शकत नाही तुम्ही जाहीर निविदा मागवा व जाहीर पणे तुमच्याकडे जे अर्ज प्राप्त होतील त्यानंतर तुम्ही शासनाकडे प्रस्ताव पाठवला पाहीजे दुसरी गोष्ट घनकचरा व्यवस्थापनाचा डिपीआरच शासनाने आपल्याला मंजुर करून दिला याच्यामध्ये शासनाने जो डीपीआर मंजुर केलेला आहे त्या अनुषगांने हे काम अभिप्रेत आहे हा प्रस्ताव जोआपण दिलेला होता त्याचे आपण रिमांईडर लेटर सुध्दा दिलेले आहेत पण शासनाकडुन कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही .

मा.आयुक्त :- आता हा विषय शासनाकडे आहे तरी मला असे वाटते की हा विषय तहकुब करावा व त्यावर आपण अभ्यास करावा मग नंतर निर्णय घ्यावा.

श्री.चेतन सनकत :- पुढील मिटींग पावेतो तहकुब ठेवावा.

City Of Jalgaon

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावा संदर्भात अभ्यास करावयाचा असल्याने सदरचा प्रस्ताव तहकूब ठेवणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११** **प्रतिकुल मते :-** ००

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:-** विषय क्र. १०. मालमत्ता कर न भरणारे थकबाकीदारांच्या मिळकतींचा सन २०१९-२० मध्ये जाहीर लिलाव करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.चेतन सनकत :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

श्री.नितीन बरडे :- आम्ही तटस्थ आहोत साहेब जळगांव शहरात एवढेच थकबाकीदार आहेत का ? ३८ थकाबाकीदार आहेत का व यांची थकबाकी किती आहे.

मा.आयुक्त :- ही यादी फक्त ३८ ची आहे असे काही अजुन थकबाकीदार आहेत .

श्री.नितीन बरडे :- तरी अंदाजे थकबाकी किती आहे याची माहिती दयावी.

मा.आयुक्त :- या यादीमधील का आत्ताची ?

श्री.नितीन बरडे :- होय

श्री.व्हि.ओ.सोनवणी :- एक लाखाच्यावर चे थकबाकीदार आहेत त्यात एकच मोठी ड्ढ फुडची प्रापर्टी आहे 1 कोटी 27 लाखाची वीस वर्षाची थकबाकी आहे त्यावर कारण कोर्टाचा स्टे होता व तो हटला म्हणून तीचा लिलाव करायचा आहे.

श्री.नितीन बरडे :- म्हणजे याच्यात वीस वीस वर्षाची थकबाकी आहे का ?

श्री.व्हि.ओ.सोनवणी :- नाही तशी नाही दोन वर्ष तीन वर्ष चार वर्ष अशी आहेत.

श्री.नितीन बरडे :- यादीतील सुलोचनाबाई चव्हाण यांनी अपील केलेले आहे यांच्या मालमत्तेच्या बाजुला दुसऱ्याची मालमत्ता आहे आणि त्या मालमत्तेची मोजणी यांच्या मालमत्तेत केली गेलेली आहे.

मा.आयुक्त :- कुणी केली आहे ?

श्री.नितीन बरडे :- प्रभाग अधिकारी यांनी केली आहे , कारण की प्रभाग समिती क्रं. ०२ याच्यात मध्यस्थी मीच झालो होतो ती मोजणाऱ्याला सांगीतले होते की सव्वा लाख रूपये थकबाकी होती समोरच्या पार्टीने ५० हजार रूपयाचे चेक दिलेले होते घ्यायला नाही म्हणाले सव्वा लाख रूपये होते फक्त त्यात सुध्दा असे झाले आहे की दुसऱ्याची प्रॉपर्टी मोजली गेली आहे .

मा.आयुक्त :- अपील केले आहे का ?

श्री.सुभाष मराठे :- अपील बाबतीत मला माहिती नाहीये आणि जसे सन्मा.सदस्य म्हणताहेत याची मला खात्री करावी लागेल.

श्री.नितीन बरडे :- त्यावेळी मराठे साहेब नव्हते , पाटील साहेब ही नव्हते त्यावेळी उदय पाटील साहेबच होते

मा.आयुक्त :- ते आत्ता भरायला तयार आहेत का ?

श्री.नितीन बरडे :- अहो साहेब त्यांच्या प्रॉपर्टीची

मा.आयुक्त :- नाही नाही जर ते भरायला तयार असतील तर काही हरकत नाही .

श्री.विष्णू भंगाळे :- जे भरायला तयार असतील त्यांचे भरून घ्या.

मा.आयुक्त :- एक लाखाच्या आत असेल तर ठिक आहे आपण करू.

श्री.नितीन बरडे :- एक ते दिड कोटी आहेत साहेब ही फक्त ऐवढीच आहे किती कोटी रूपये जळगांव शहराचे बाकी आहेत त्याचे काय .

मा.आयुक्त :- नाही ही सुरूवात आहे सगळे त्यात येतीलच आणि कसेआहे बऱ्याच दिवसांनंतर ही सुरूवात झालेली आहे हा विषय आणण्याच्या उंददेश्य असा आहे की जर एखादी प्रापर्टी कोणी नाही घेतली तर नाममात्र बोली लावुन ती महानगरपालिका घेईल .

श्री.नितीन बरडे :- ईतर सर्व थकबाकीदारांना हेच लागु होतील का

मा.आयुक्त :- होय सर्वांनाच होईल ज्यांच्या कडे थकबाकी आहे त्यांना होईलच

श्री.नितीन बरडे :- मग जळगांव शहरात करोडो रुपयांची थकबाकी आहे

मा.आयुक्त :- नाही तुम्ही एक्सक्युज करा

श्री.नितीन बरडे :- आमची तटस्थ भुमिका आहे . हे पहा साहेब आम्ही सार्वजनिक क्षेत्रात काम करतोय आम्हाला नागरीकांनी निवडुन दिलेले आहे चांगले काम होते ,वाईट कामे होतात दोन्ही व सर्व होतात आज ११ वर्ष झाले मी पण

Municipal Corporation Of जळगांव महानगरपालिका जळ

नगरसेवक आहे प्रभागात चांगले काम होवो की वाईट होवो पुढे काही नावावर बदनामी येतेच , तुम्ही जे म्हणताहेत कुठेतरी तुम्ही सहभागी व्हायला पाहीजे आजपर्यंत तुमच्याकडे ३ ते ४ तक्रारी दिल्या पण अजुन पर्यंत खालपर्यंत आलेल्या नाहीत साहेब तुम्ही अधिकारी आहेत तुमचे काहीच होत नाही मी तक्रारी केलेल्या आहेत पुढचे सर्व विषय विकास कामांचे आहेत , विकास कामांचे ईस्टीमेट तयार करतात कोणते अधिकारी गुणवत्ते नुसार काम करतात , गुणवंत म्हणुन तीन वेळा बोलावले मी आहे म्हणुन आजपर्यंत सर्व आयुक्तापर्यंत मी बोललेलो आहे तुम्ही सुध्दा बघा मी शहर अभियंत्यांनाही बोललो तुम्ही कामांवर हे करा .

मा.आयुक्त :- आजच करतो नाही एखादया विशिष्ट अधिकाऱ्याबददल तक्रार असेल तर निश्चितच कार्यवाही करू .

श्री.नितीन बरडे :- तक्रारी कोणी देत नाही ना .जबाबदारी अधिकाऱ्यांची आहे

मा.आयुक्त :- जबाबदारी अधिकाऱ्यांची आहे पण तुम्ही स्पेसिफीक तक्रार दया आणि त्याच्यावर योग्य ती कार्यवाही करू त्या व्यतिरीक्त मी आधीच बोललो की अधिकाऱ्याचीच जबाबदारी आहे जर ते काम व्यवस्थित नसेल तर त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही हाईल .

श्री.नितीन बरडे :- मी तुमच्याकडे आजच लेखी तक्रार देणार आहे .

मा.आयुक्त :- दया

श्री.नितीन बरडे :- आजच देईल .

मा.आयुक्त :- भविष्यात जरी तक्रार आली तरी भविष्यात त्याच्यावर कार्यवाही होईल .

श्री.नितीन बरडे :- मी तक्रार दिली होती मी अमृतकर साहेबांचे सर्व लेखी मागीतलेले आहे त्यांच्या देखरेखीखाली काली कामे झालेली आहेत त्याचे सर्व मागीतलेले आहे. नंतर माझ्याकडे सर्व माहिती आहे संपुर्ण शहरात २५ कोटीमध्ये काय कामे झालेली आहेत हे अक्षरक्ष: मातीत कामे झालेली आहेत हे तुमच्या लक्षात येणार नाही पोल लावतांना थोडयाप्रमाणात सिमेंट टाकुन दिलेले आहे तो पोल मातीत गाडल्या गेलेला आहे तो पोल सार्वजनिक क्षेत्रात आम्ही काम करतोय व चांगल्या कामाकरीता आमची भुमिका ही तटस्थ राहणार आहे .

श्री.दिलीप पोकळे :- मला थोडा वेळ पाहीजे सन्मा.सदस्य तुम्ही हो की नाही म्हणजे काय आहे .

श्री.नितीन बरडे :- तटस्थ आहे.

श्री.दिलीप पोकळे :- तटस्थ म्हणजे काय सभापती महोदय .

श्री.विष्णू भंगाळे :- सभापती महोदय वसुली साठी आम्ही आमची भुमिका मांडली परंतु कसे होत आहे छोटे मोठे व्यवसाय करणारे आहेत त्यावर आपण हा वसुली म्हणुन पाऊले उचलत आहोत पण याआधी मनपाची खुप मोठी वसुली बाकी आहे तर त्या माध्यमातुन आपले लक्ष केंद्रीत करू ईच्छितो व या बाबतीत ही निदर्शनास आणु ईच्छितो की आपण त्या गोष्टींकडे लक्ष देणार आहात का ? किंवा आपण यावर निर्णयघेणार आहात का ? जे छोटे आहेत ते तर भरतीलच जे नाही भरत आहेत त्यांचे काय ?

श्री.नितीन बरडे :- जे नाही भरत आहेत त्यांचे काय हे तर भरणारच आहेत कारण त्यांच्या स्वत:च्या प्रापर्टी आहेत तर ते भरणारच आहेत .

मा.सभापती :- भाऊ आता आपण सुरूवात केलेली आहे तर सर्वच भरतील आपण सगळे मार्ग मोकळे करू .

श्री.विष्णू भंगाळे :- सभापती महोदय आपण म्हणताहेत की आपण सर्व मार्ग मोकळे करू काही ठिकाणी स्टे आहेत तर आपण काही निर्णय घेणार आहेत का प्रायोरिटीने आपण काही घेणार आहात का ? सभागृहासमोर हे यायला पाहीजे.

मा.आयुक्त :- हा वसुलीचा लिलाव आहे आणि तो आजच लिलाव होता जर समजा कोणी बोली नाही लावली तर नाममात्र बोली लावुन आपणच घेणार आहोत .

श्री.विष्णू भंगाळे :- अध्यक्ष महोदय सभागृहाला मी एक प्रश्न विचारू ईच्छितो ज्यांच्याकडे लाख व सव्वा लाख बाकी आहे ती किती वर्षापासुन आहे .

मा.उपायुक्त (महसुल) :- साधारणत: तीन ते चार वर्षापासुनची बाकी आहे . त्यात काही लोकांकडे 1995 पासुन बाकी आहे

श्री.विष्णू भंगाळे :- ती यादी आपण काढली नाही का ?

मा.उपायुक्त (महसुल) :- ती यादी आपण काढली आहे .

श्री.विष्णू भंगाळे :- मग आपणसर्वांना एकच लाईनीत घेतले आहे का ? म्हणजे ज्यांच्याकडे 95 पासुन बाकी असेल आणि कुणाकडे तीन चार वर्षापासुन बाकी असेल किंवा काही प्रॉब्लेम असेल या माध्यमातुन वसुल होतील का

मा.आयुक्त :- या विषयी असे आहे की दरवर्षी साधारण फेब्रुवारी महिना आला की आपली वसलीची गरबड सुरू होते मार्च महिन्यात ती शिगेला पोहोचते आणि आपण बोर्ड लावतो सगळीकडे परंतु त्यातुन काही होत नाही तर ही जबाबदारी आहे व वसुली साठी हा प्रयत्न आहे मला वाटते ऑड महिन्यात हा विषय कधी आला नसेल

शहर
पालिका
गांव
the City of Jalgaon

श्री.विष्णू भंगाळे :- माझे म्हणणे ईतकेच आहे की काही दोन तीन वर्षासाठी व छोटया मोठया नागरीकांवर काही असेल तर

मा.आयुक्त :- प्रत्येकाचे वर्ष वेगवेगळे असतील म्हणजे लाखचे वरचे असे थकबाकीदार आहेत .

श्री.विष्णू भंगाळे :- आमची भुमिका तटस्थ आहे .

श्री.चेतन सनकत :- साहेब

श्री.नितीन बरडे :- साधारण लोकांच्या घरासमोर डफडे वाजविण्यात आले ज्यांच्या मागे मोठयांचे हात आहेत त्यांचे काहीच नाही .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दितील काही मिळकतधारकांनी त्यांचेकडेस असलेल्या थकीत मालमत्ताकराचा भरणा केलेला नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदींनुसार दरवर्षी सदर मिळकत धारकांना मालमत्ता कराची देयके बजाविण्यात आलेली असुन कराचा भरणा करणे बाबत कळविलेले असून संबंधित थकबाकीदारांकडे वेळोवेळी तगादा लावणे, नळ संयोजन बंद करणे, जप्तीपुर्वीच्या नोटीस बजावणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम अनुसूचि 'ड' प्रकरण आठ 'कराधान नियम' कलम 46 मधील तरतूदींनुसार नमुना 'आय' मध्ये नोटीस बजावण्यात आलेली होती. तरी देखील सदर मिळकत धारक त्यास न जुमानता मालमत्ताकराचा भरणा करित नाहीत.

३८ थकबाकीदार मिळकतधारकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसुची "ड" प्रकरण आठ "कराधान नियम" मधील कलम 44 व 46 अन्वये नोटीस सुध्दा बजाविण्यात आलेल्या आहेत. अधिनियमातील तरतुदीनुसार सदर नोटीस बजावुन 21 दिवसांचा कालावधी उलटुन गेल्यावर सुध्दा सदर मिळकतधारकांनी त्यांचे कडेस येणे बाकी असलेल्या मालमत्ताकराचा भरणा केलेला नाही. त्यामुळे सदर मिळकतींची थकबाकी पोटी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसुची "ड" प्रकरण आठ "कराधान नियम" मधील कलम 47 अन्वये बोली लावुन विक्री करणे आवश्यक आहे. सदर विक्री करतांना सोबत जोडलेल्या यादीतील मिळकतींच्या संदर्भात किंवा एखाद्या मिळकतीच्या संदर्भात कोणीही बोली न बोलल्यास अशा वेळी उक्त नमुद अधिनियमातील कलम 47 (7) अन्वये अशा मिळतीबाबत स्थायी समितीच्या मान्यतेने नाममात्र बोली आयुक्त यांनी बोलेणे कायदेशीर आहे. असे नमूद आहे. तरी लिलावावेळी सोबतच्या तक्त्यांत नमूद केलेप्रमाणे सर्व किंवा कोणत्याही एका मिळकतीच्या बाबतीत लिलावात बोली बोलण्यासाठी कोणीही उपस्थित न राहिल्यास महानगरपालिकेच्या वतीने नाममात्र बोली आयुक्त. यांनी बोलेणेसाठी मान्यता प्रदान करणेत येत आहे.

सोबतच्या यादीतील मिळकतींचा तसेच यानंतरही काही थकबाकीदार मिळकतींचा सन 2019-20 मध्ये जाहीर लिलाव करताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसुची "ड" प्रकरण आठ "कराधान नियम" मधील कलम 47 (7) मधील तरतूदींनुसार आयुक्त यांना महानगरपालिकेच्या वतीने नाममात्र बोली बोलणेकामी मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय/आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- ०८** **प्रतिकुल मते :- ००** **तटस्थ :- ०३**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

नगरसचिव:- विषय क्र. ११) जळगांव शहर महानगरपालिकेत मनुष्यबळाची कमतरता असल्याने शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत जळगांव मनपा मध्ये विद्यावेतनावर शिकाऊ उमेदवारीची ५१ पदांची नेमणूक करणेस व त्याकामी येणारा अंदाजित खर्च रक्कम रु.४० लक्ष मात्रला मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.चेतन सनकत :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे .

श्री.नितीन बरडे :- नगरसचिव साहेब आमची तटस्थ भुमिका आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव महानगरपालिकेच्या जवळ जवळ सर्वच विभागात कर्मचारी / अधिकारी यांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे. दवाखाने विभागासारख्या अत्यावश्यक विभागात सुद्धा ही स्थिती आहे. त्यामुळे रुग्णांवरील अत्यावश्यक उपचार इत्यादीत अडचणी उद्भवण्याची स्थिती आली आहे.

महापालिकेच्या विविध विभागात पूर्वी कार्यरत कर्मचारी आता सेवा निवृत्त झाल्याने अनेक जागा रिक्त आहेत. नवीन भरती झालेली नाही. या स्थितीतून मार्ग काढण्यासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याबाबत मा.उपमहापौर म.न.पा.जळगांव यांनी पत्र क्र.आ.जा.क्र./उमका/170/दि.25/02/2019 च्या पत्राव्दारे कळविलेले होते. त्यानुसार खालील पदांकरीता जळगांव महानगरपालिकेत Apprentices Act, 1961 अंतर्गत विद्यावेतनावर शिकाऊ उमेदवार नेमणूक अधिनियम

Municipal Corporation Of जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

1961 नुसार विहित केलेल्या प्रशिक्षण कालावधीसाठी शासनाकडील किमान वेतन दरानुसार विद्यावेतनावर नियुक्ती केली जाणार असल्याने एक वर्षाचा प्रशिक्षण कालावधी संपलेवर नेमणूक संपूष्टात येईल त्यानंतर अशा उमेदवारांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवाविषयक सवलती व इतर फायदे असणार नाहीत तसेच जळगांव महानगरपालिकेतील कोणत्याही पदांवर हक्क राहणार नाही.

| अ. क्र. | विभागाचे नांव ( विभागाची मागणी संख्या) | Apprenticeship अंतर्गत भरावयाचे पदाचे नांव | पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 ) | प्रभाग समिती क्र. 1 (2),प्रभाग समिती क्र. 2 (2), प्रभाग समिती क्र. 3 (2), प्रभाग समिती क्र. 4 (2), शिक्षण मंडळ (2), बांधकाम (2), बारनिशी (1),वाहन व्यवस्था (1),माता बाल संगोपन केंद्र (1),चेतनदास रुग्णालय (1),नानीबाई अग्रवाल (1), विद्युत (1),साने गुरुजी ग्रंथालय (1), नगररचना (2) पाणी पुरवठा विभाग (3),जनसंपर्क (1) | कॉम्प्युटर ऑपरेटर / क्लर्क | 25 |
| 3 ) | विद्युत (12), पाणी पुरवठा विभाग (2), | वायरमन | 14 |
| 4 ) | पाणी पुरवठा विभाग | प्लंबर | 2 |
| 5 ) | पाणी पुरवठा विभाग | फिटर | 2 |
| 6 ) | पाणी पुरवठा विभाग | इलेक्ट्रीशियन | 5 |
| 7 ) | वाहन व्यवस्था विभाग | डिझेल मेकॅनिक | 1 |
| 8 ) | नगररचना (1) | सर्व्हेअर | 1 |
| 9 ) | सा.बां.विभाग | सुतार | 1 |
| | | एकूण :- | 51 |

नमूद 51 शिकाऊ उमेदवारांचे विद्यावेतनावर एका वर्षासाठी अंदाजित रु.40/- लक्ष खर्च अपेक्षित आहे. याप्रमाणे दरवर्षी शिकाऊ उमेदवारांची नेमणूक केल्यास कमी आर्थिक खर्चात गतिमान कामकाजास मनुष्यबळाची मदत होईल.

जळगाव शहर महानगरपालिकेत शिकाऊ उमेदवार अधिनियम 1961 अंतर्गत विद्यावेतनावर एक वर्षाचे कालावधीसाठी उपरोक्त नमुद 51 पदांवर नेमणूक करणेस तसेच वार्षिक अंदाजित खर्च रक्कम रुपये 40 लक्ष मात्र ला व यापुढे दरवर्षी विद्यावेतनावर शिकाऊ उमेदवार अधिनियम 1961 अंतर्गत शिकाऊ उमेदवार नेमणूक करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- ०८ प्रतिकुल मते :- ०० तटस्थ :- ०३**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

नगरसचिव:- विषय क्र. १२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

श्री.चेतन सनकत :- मान्य आहे .

श्री.सुनिल खडके :- १ ते १२ पुर्ण मान्य आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.३७ दि.२५/०७/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०७ अंतर्गत जळगांव शिवार न.भु.क्र.७६७० श्रीनिवास कॉलनी येथील खुल्याजागेमध्ये पाथवे तयार करणे व प्रभाग क्र.०७ अंतर्गत जळगांव न.भु.क्र.७८६३ श्रीकृष्ण कॉलनी येथील खुल्याजागेमध्ये चेनलिंक फेन्सींग

करणे कामी मक्तेदार प्रविण काशिनाथ राणे यांचे निविदा रकमेपेक्षा ७.५९% कमीचे दर रक्कम रु.१४,६८,१३८/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.३८ दि.२५/०७/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०३ अंतर्गत स.नं.७५ जळगांव शिवार या मध्ये WBM रस्ते तयार करणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील,कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेइतकेचेच कमीचे दर रक्कम रु.१५,४९,९९७/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.३९ दि.२५/०७/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१३ मोहन नगर स.नं.४४८ ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व प्रभाग क्र.१३ शारदा कॉलनी स.नं.४४७ ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व प्रभाग क्र.१३ मोहन नगर स.नं.४४९ ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार निखील कृष्णराज पाटील यांचे निविदा रकमेपेक्षा १०.७५% कमीचे दर रक्कम रु.१४,१२,२९७/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.४० दि.२५/०७/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.११ पिंप्राळा गट.नं.१९९ मुकुंद नगर मधील ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व लोखंडी गेट बसविणे (स्वामी समर्थ केंद्र) व प्रभाग क्र.११ विदयुत कॉलनी गट नं.६३ मधील ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व गेट बसविणे कामी मक्तेदार विलास पी. पाटील यांचे वाटाघाटीअंती निविदा रकमेइतकेचेच दर रक्कम रु.२०,३०,१०४/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.४१ दि.२५/०७/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०७ अंतर्गत जळगांव शिवार न.भु.क्रं.८३०८ हनुमान मंदीर येथील खुल्याजागेमध्ये पाथवे तयार करणे कामी मक्तेदार विलास प्रभाकर पाटील यांचे निविदा रकमेइतकेचेच दर रक्कम रु.१०,४१,२२१/- मात्र खर्चाची संविदा.

६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.४२ दि.२६/०७/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०३ अंतर्गत स.नं.७७/५+७७/६ जळगांव शिवार मध्ये WBM रस्ते तयार करणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील,कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेइतकेचेच कमीचे दर रक्कम रु.१५,४९,९९७/- मात्र खर्चाची संविदा.

७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.४४ दि.०७/०८/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विशेष निधी अनुदान विकास योजने अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.२८ सागरपार्क स.नं.४३१ टि.पी.स्कीम III फायनल प्लॉट नं.EFG येथे जॉगींग ट्रॅक तयार करणे कामी मक्तेदार पद्मालया,कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेपेक्षा ३.०३% कमीचे दर रक्कम रु.२४,२०,६९५/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.४५ दि.०७/०८/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विशेष निधी अनुदान विकास योजने अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.२८ स.नं.४३१ सागरपार्क जागेला चेनलींक फेन्सींग करणे कामी मक्तेदार पद्मालया,कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेपेक्षा ३.०३% कमीचे दर रक्कम रु.१४,५७,१८८/- मात्र खर्चाची संविदा.

९. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/०१ दि.१०/०७/२०१९ अन्वये विदयुत विभाग यु.क्रं.०१ अंतर्गत येणाऱ्या अशोक बेकरीजवळील बगीचेत ६ मी.उंचीचे पोल उभारुण लाईट व्यवस्था करणे कामी मक्तेदार वरद इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतकेचेच कमीचे दर रक्कम रु.२,२२,२३१/- मात्र खर्चाची संविदा.

१०. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./४७ दि.०८/०८/२०१९ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहरातील डांबरी रस्ते दुरुस्ती कामी ट्रॅक्टर व मजुर पुरविणेचे मंजुर दरात त्याच मक्तेदाराकडुन पावसाळ्याच्या ४ महिन्याच्या कालावधी साठी १२ मजुर पुरविणे कामी मक्तेदार एस.के.कॉन्ट्रॅक्टर यांचे यापुर्वी मंजुर असलेले दर प्रति मजुर प्रति दिन रक्कम रु.५२०/- मात्रचे दरात काम करुन घेण्यात यावे त्यास रक्कम रु.७४८८००/- मात्र खर्चाची संविदा.

Corporation Of
जळगांव
महानगरप
जळ

११. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/०३ दि.०८/०८/२०१९ अन्वये विदयुत विभाग राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वरील मनपा मार्फत उभारणी करण्यात आलेले ११ मीटर उंचीचे पोल व २१ मीटर उंचीचे दोन हायमास्ट पोल निष्कासीत करणे कामी मक्तेदार वरद इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेत कमीचे दर रक्कम रु.२,६८,७६९/- मात्र खर्चाची संविदा.

१२. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/०४ दि.१६/०८/२०१९ अन्वये विदयुत विभाग यु.क्र.०१ अंतर्गत खॉजामिया चौक ते प्रभुदेसाई चौक पावेतो ९ मिटर उंचीचे Octagonal पोल उभारुन लाईट व्यवस्था करणे कामी मक्तेदार वरद इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेपेक्षा ०.५% कमीचे दर रक्कम रु.११,९८,२४७/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

नगरसचिव जादा विषय क्रं. १ ) २५ कोटी विशेष निधीतून जळगांव शहरातील अ) मनपा वार्ड क्रं.१२ अंतर्गत व्दारका नगर, आहुजा नगर, चंदु आण्णा नगर, जुना हायवे, सुरत रेल्वे गेट ते निमखेडी गावकडील रोड, दादावाडी परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नविन पोलची उभारणी करणे. व स्ट्रिट लाईट फेज वायर ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) ब) वार्ड क्रं.५ अंतर्गत परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे स्ट्रिट लाईट फेज वायर ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) क) वार्ड क्रं.३१,३२,३३ व ३५ अंतर्गत सिध्दार्थ नगर, बौध्द वाडा, इकबाल कॉलनी, शांती नगर तसेच मेहरुण युनिट परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे स्ट्रिट लाईट फेज वायर ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) कामी मक्तेदाराने निविदेत भरलेले दर/वाटाघाटी अंतीचे ८.२५% जास्त दर स्विकारणेस या कामी येणाऱ्या पर्यायी एकुण रक्कम रु.५४.८६.८५२/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणे कामी तसेच प्रशासकीय मान्यता मिळण्यानुसार रक्कम रु.५०,६८,६८५/- मात्र खर्च विशेष निधीतुन व उर्वरित रक्कम रु.४,१८,६६७/- मात्र खर्च मनपा फंडातुन करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.चेतन सनकत :- प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव मान्य आहे.

श्री.नितीन बरडे :- सभापती साहेब आमची तटस्थ भुमिका आहे .

श्री.सुनिल खडके :- या मध्ये मला कळत नाहीये वॉर्ड नं. ३१ , ३२ , ३३ व ३५ कोणते वॉर्ड आहेत हे मला सांगा असे कोणतेच वॉर्ड नाहीत .

श्री.सुशिल सांळुखे :- हे दोन वर्षापुर्वीचे ईस्टिमेट आहेत हे जुने वॉर्ड नंबर आहेत.

अड .शुचिता हाडा :- सभापती साहेब आणि आयुक्त साहेब मला दोन तीन गोष्टी विचारायच्या होत्या मागील स्थायी समिती मध्ये आपण लिफट चे टेंडर मंजुर केलेले आहे मनपाचे तर त्यांचे कार्यादेश दिले गेले का आतापर्यंत एक सुचना आहे की आता ओपन जागेचा निकाल लागलेला आहे त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे खुप हाल होत आहेत या लिफट मुळे तर आपण मंजुरी दिलेली आहे तरी लवकरात लवकर कार्यादेश देण्यात यावे .

श्री.सुशिल सांळुखे :- कंपनीचे माणसे आलीली आहेत परंतु अतिपावसामुळे मुंबईचे फलाईट रदद झालेले आहे ते आज रात्री तेथुन बसतील व उदया सकाळी येतील त्यांना ही अपेक्षा होती स्टॅम्प वगैरे घेतले गेलेले आहेत फक्त सहया करणेसाठी व अथॉरिटी साठी ते येत आहेत .

अड .शुचिता हाडा :- एक विषय अजुन असा आहे स्वच्छ भारत अभियांतर्गत जी आपण प्रक्रीया व खरेदी करतो पुर्ण करत आहोत तर आम्हाला त्याची डिटेल्स पाहीजेय म्हणजे स्वच्छ भारत अभियांतर्गत आत्तापर्यंत आपण काय काय खरेदी केलेले आहे किती खरेदी केले व किती रक्कमेचे खरेदी केले याची लेखीस्वरुपात डिटेल्स हवी आहे ही एक मागणी आहे . त्यानंतर एक विषय आहे आपले कोर्ट चौक ते ख्वॉजामिया चौक जे बैरिगेटस लावले गेले आहे त्यामध्ये एमएसईबीचे पोल उभे केले गेलेले आहेत पण आधी जे पोल होते साईडला ते काढले गेले नाहीत कारण त्यामुळे काय होते की वाहतुकीला अडचणी व नागरीकांच्या ही काही तक्रारी आहेत तरी एमएसईबी सोबत पत्रव्यवहार करून हा विषय मार्गी लावावा जेणेकरून वाहतुक सुरळीत होईल किंवा त्याबददल काही कार्यवाही केलेली असेल तर ती लक्षात आणुन दयावी .

श्री.सुशिल सांळुखे :- आपण ही गोष्ट युध्दपातळीवर केली होती परंतु आपल्याला फायनान्शील अडचणी आल्या होत्या तसेच मक्तेदाराशी सुध्दा आपण बोललो होतो पुढच्या आठवडयाच्या आंत ते काम पुर्ण होईल .

अड.शुचिता हाडा :- माझा प्रश्न हा आहे की आधीचे जे पोल आहेत .

र
रका
City of Jalgaon

श्री.सुशिल साळुंखे :- तसे करता येत नाही ताई कारण काय आहे जो पावेतो मेन लाईन त्या पोल वरून नविन पोलवर शिफटींग करणार नाहीत तो,पावेतो बंद करता येणार नाही तर आपण आधी नविन पोल वर शिफटींग करून घेवु त्यांनतर आपण डेड पोल काढुन घेवु शकतो .

अड शुचिता हाडा :- मग जेवढे झाले आहेत ते करा .

श्री.सुशिल साळुंखे :- हो आपण सुरूवात केलेली आहे आपण गणेश कॉलनी पासुन सुरूवात केली आहे व ते पोल काढले गेलेले आहेत फक्त आपले ख्वॉजामिया चौक ते कोर्ट चौक आपले काम बाकी आहे .

अड शुचिता हाडा:- तरी हे काम कधीपर्यंत होईल .

श्री.सुशिल साळुंखे :- मटेरियल आलेले आहे पुढील आठवडयात काम होईल .

श्री.नितीन बरडे :- अध्यक्ष महोदय आपण 1.3 महावितरण ला देतोय यांच्या सुपरव्हिजन मध्ये काय सहभाग आहे.

श्री.सुशिल साळुंखे :- हे काम असे आहे की हे काम वितरणाच्या सुपव्हिजन मध्ये व ईस्टीमेट मध्ये केलेले आहे आणि त्यांच्या दराने , सुपरव्हिजन व टेक्निकल बाबींमध्ये असेल तरी यावर एमएसईबीचे जे इंजिनियर , अधिकारी आहेत त्यांचे या कामावर सुपरव्हिजन असते .

श्री.नितीन बरडे :- त्यांचे काय सुपरव्हिजन आहे किंवा त्यांनी तुम्हाला काय पत्र दिले .

श्री.सुशिल साळुंखे :- तसे नाही भाऊ काय आहे हे काम आत्ता सुरू झालेले आहे .

श्री.नितीन बरडे :- पण एमएसईबीने सुपरव्हिजन केलेचनाही आत्ता मी तुम्हाला पाच मिनिटांपुर्वी बोललो एमएसईबीने सुपरव्हिजन केले आहे का हे सांगा तुमचे माणसे होती त्या ठिकाणी तुमच्या सोबत होते का एमएसईबीचे लोक फक्त कोर्ट चौक ते शिफटींग च्या वेळेस असतील बाकी म्हणजे जळगांव शहरतील कॉलन्यामध्ये आपण किती पोल लावले सांगुन दया तुम्ही होते का एमएसईबीचे लोक .

श्री.सुशिल साळुंखे :- ज्यावेळी आपण परमिट घेतो त्यावेळी एमएसईबीचे माणसे आपल्या सोबतच असतात कारण की परमिट घेण्याचे परमिशन एमएसईबीचेच असते .

श्री.नितीन बरडे :- आणि साहेब परमिट केव्हा घ्यावे लागते .

श्री.सुशिल साळुंखे :- काम सुरू करण्यापुर्वी

श्री.नितीन बरडे :- परमिट हायटेंशनची लाईन असते तेव्हा घ्यावे लागते .

श्री.सुशिल साळुंखे :- नाही हायटेंशन नाही कुठलीही लाईन असली तरी घ्यावे लागते .

श्री.नितीन बरडे :- ऐका एम्टी असलेली लाईन सुध्दा कोणी बंद केली ती लाईन .

श्री.सुशिल साळुंखे :- नाही काम करतांना .

श्री.नितीन बरडे :- फक्त इंजिनियर ला फोन केला की लाईन बंद केली काय सुपरव्हिजन केले हे त्यानाही विचारून घ्या . आणि आता तर पोल अक्षरश: मातीत गाडलेला आहे .यांच्या माणसांना विचारून घ्या. पोल पडला काही झाले म्हणजे कोण करणार आहे आणि हे स्ट्रिट लाईट चे काय आहे लावणार कुठे आहे स्ट्रीट लाईट म्हणजे काय हायमास्ट आहे का काय..

श्री.सुशिल साळुंखे :- हे पहा काय आहे फक्त दोन लाईन चे फेज असतात तिसरा एक फेज आपला असतो .

श्री.नितीन बरडे :- नविन पोलचे म्हणतोय मी .

श्री.सुशिल साळुंखे :- नविन असो की जुना

श्री.नितीन बरडे :- साहेब एक विचारा मी आता 11 वे वर्ष झाले मी निवडुन आलोय त्या भागातुन त्या भागात दिड ते दोन वर्ष झालेत तिथले लाईट बंद आहेत. रात्री दोन वेळा चेंज झाले तिथे एकलव्य च्या मागचा पुर्ण भाग अंधारात आहे .

श्री.सुशिल साळुंखे :- त्याचे कोटेशन काढुन .

श्री.नितीन बरडे :- कधीचे एक वर्ष झाले कोटेशन काढुन व टेंडर काढुन एक वर्ष होवुन गेले आहे .

श्री.सुशिल साळुंखे :- मनपा फंडातुन काम आहे त्याचे कार्यादेश देण्यात आलेले आहे पुढील आठवडयात ते काम होईल.

श्री.नितीन बरडे :- एक वर्ष झालेय तिथे पुर्ण अंधार आहे होस्टेल मध्ये मुली राहतात .

श्री.सुशिल साळुंखे :- कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

श्री.चेतन सनकत :- साहेब स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी आपले सन्मा .नगरसेवक श्री. राजुभाऊ मराठे हे यांनी काही विषय उपस्थित केले होते ते शाळेत गेले होते त्याठिकाणी विदयार्थी संख्या कमी होती त्या संबंधीत त्यांनी पत्रव्यवहार केलेला आहे त्या पत्रव्यवहाराचे काय झाले आहे त्याची माहिती पाहीजे आहे . स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी

Municipal Corporation जळग महान

पटसंख्या जी आहे जेवढी पाहीजे होती त्या काही 20 मुले होती त्यासंदर्भात पत्रव्यवहार केलेला आहे त्याची माहिती पाहीजे शाळा क्रं. १३ व शाळा क्रं.१

श्री.चंद्रकांत वांद्रे :- आपण संबंधित मुख्याध्यापकांना नोटीस काढलेली आहे आणि त्यानंतर प्रशासन अधिकारी आल्यानंतर त्यांचेवर काय कारवाई करायची ती करण्यात येईल.

श्री.चेतन सनकत :- दुसरा विषय शिवाजी नगर हॉस्पीटल संबंधी काय झाले .

श्री.राम रावलानी :- सन्मा .सभागृह व सन्मा.सभापती महोदय त्यापैकी काही कामे झालेली आहे व काही संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेली आहेत.तसेच काही ईस्टिमेट तयार करण्यात आलेले आहेत .

श्री.चेतन सनकत :- जे ईस्टिमेट झालेले आहेत परंतु तो विषय का मार्गी लागत नाही तुम्ही लक्ष देणे गरजेचे आहे .

श्री.राम रावलानी :- होय .

मा.आयुक्त :- मनपा मध्ये निधी उपलब्ध झालेनुसार काही कामे हाती घेण्यात येईल.

श्री.रियाज बागवान :- मी मागील मिटींग मध्ये बोललो होतो की मुलतानी दवाखान्याबाबत काही किरकोळ कामे सांगीतले होती व ती झालेली आहेत किंवा त्याचे काम काही निष्पन्न निघालेलं नाही. दुसरे असे की माझी एक विनंती आहे की, मलतानी हॉस्पीटल मध्ये फिजिओथेरॅपी सुरु करायचे आहे कारण त्या ठिकाणी ओ.पी.डी.खुप जास्त आहे. आणि सर्व जातीच्या लोकांना लाभ मिळत आहे.

श्री.राम रावलानी :- संबंधित विभागांकडे तशी मागणी करण्यात आलेली आहे जसे बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभाग आहेत त्यांना ते देण्यात आलेले आहे आणि त्या ठिकाणी आपल्याकडे स्टाफ वगैरे नाहीये तर आपले मागील वेळेस डिसकशन झाले होते मागील वेळेस मी लवकरच कामे प्रस्तावित करतो व पुर्ण करायचे प्रयत्न करतो .

श्री.रियाज बागवान :- आपण लक्ष दिले तर लवकर होतील माझे एवढेच म्हणणे आहे.

श्री.राम रावलानी :- होय करतो लवकर

श्री.रियाज बागवान :- दुसरे असे की त्या ठिकाणी जो स्टाफ आहे त्यांना पीण्यासाठी पाणी नाही .

श्री.राम रावलानी :- सर ते ही करतो .

श्री.रियाज बागवान :- तेवढी आपल्याला विनंती आहे की लवकर करून दया.

श्री.नितीन बरडे :- साहेब पाणी पुरवठा बाबतीत आहे आज धरण १०० टक्के भरलेले आहे तरी आपण दोन दिवसाआड देतोय .

मा.सभापती :- आपली याबाबतीत चर्चा झाली होती त्यावेळी आवश्यक तेवढे धरण भरलेले नव्हते पुढील कॅपिसिटीच्या अनुसार आपण त्यावर निर्णय घेणार होतो त्या संदर्भात मी बोललोय त्यावर काय करता येईल ते आपण करू .

श्री.नितीन बरडे :- लेव्हल वाढलेली आहे.

श्री.विष्णु भंगाळे :- ही चर्चा जी आपली चाललेली आहे . त्यांच्याबाबतीत आपण काय निर्णय घेतले किंवा काय सांगीतले आपल्याला दोन दिवसाआड पाणी पुरवठा करायला काय अडचण आहे का त्याचे उत्तर आपण दयावे.

मा.सभापती :- खडके साहेब सांगा .

श्री.डि.एस.खडके :- ५५ टक्के धरण भरलेले आहे आणि ५० टक्के धरण भरायला पाहीजे म्हणजे तेवढा आपला कोटा मंजुर होतो १ नोव्हेबरला प्रत्येक जिल्हा व शहराचे वाटप होते आणि १ नोव्हेंबर ला आपले धरण ५० टक्के भरलेले पाहीजे आणि आज त्याठिकाणी पातळी जरी वाढली असली तरी मी साहेबांशी या विषयी बोलतो .

श्री.विष्णू भंगाळे :- आपण मागील मिटींग मध्ये सुध्दा हा विषय केला होता मागे आपण दोन दिवसाआड पाणी देत होतो आज आपण तीन दिवसाआड पाणी देतोय तर किती टक्के बचत होतेय आणि बचत होते आहे का ?
आणि तीन दिवसाआड केले तेव्हापासुन तर आतापावेतो किती बचत झाली याचे उत्तर दया.

श्री.डि.एस.खडके :- आपल्याकडे सर्व रेकॉर्ड उपलब्ध आहे ते आपणांस उपलब्ध करून देण्यात येईल.

श्री.विष्णु भंगाळे :- यंत्रणा सुरू आहे की नाही

श्री.डि.एस.खडके :- हो सर्व यंत्रणा चालु आहे.

मा.सभापती :- या संबंधी काय रेकॉर्ड असेल किंवा माहिती असेल ती काढुन दया.

श्री.विष्णु भंगाळे :- गिरणाची जी काही यंत्रणा आहे त्याबाबतीत मी मागेही बोललो होतो. ती सर्व बंद आहे.

श्री.डी.एस.खडके :- आपण मागेही याचे उत्तर दिलेले आहे .

श्री.विष्णु भंगाळे :- माहिती सभागृहाला दिलेली आहे का ?

श्री.डि.एस.खडके :- हो सभागृहाला याचे उत्तर दिले आहे.

श्री.नितीन बरडे :- माहीती दिली आहे का;

श्री.डि.एस.खडके :- साहेबांशी चर्चा करतो व नंतर निर्णय घेवु. आजच्या तारखेला १ नोव्हेंबरला ५० टक्के धरण भरलेले पाहीजे आणि त्याला अजुन दोन महिने बाकी आहेत मी साहेबांशी चर्चा केल्यानंतर निर्णय घेईन .

श्री.विष्णु भंगाळे :- आजच्या तारखेला ५० टक्के धरण भरलेले आहे का ?

मा.सभापती :- हो झाले आहे.

श्री.विष्णू भंगाळे :- आजपर्यंत आपण नोंव्हेंबर मध्येच असे करत होते का

श्री.डि.एस.खडके :- आजपर्यंत तशी वेळ आलेली नाहीये परंतु जिल्हास्तरीय पाणी वाटप १ नोव्हेंबर ला होते .

श्री.विष्णू भंगाळे :- आपली स्थानिक स्वराज्य संस्था म्हणुन आपले जे अधिकार आहेत ते पाणी वापरण्याचे अधिकार आपल्याला नाहीत का ?

श्री.डि.एस.खडके :- नाही आपण याचा प्रस्ताव पाठवितो व त्याचा निर्णयपालकमंत्री घेतात आणि नोव्हेंबरच्या पहील्या आठवडयात ती मिटींग होते .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, २५ कोटी विशेष निधीतून जळगांव शहरातील अ) मनपा वार्ड क्रं.१२ अंतर्गत व्दारका नगर, आहुजा नगर, चंदु आण्णा नगर, जुना हायवे, सुरत रेल्वे गेट ते निमखेडी गावकडील रोड, दादावाडी परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नविन पोलची उभारणी करणे. व स्ट्रिट लाईट फेज वायर ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) ब) वार्ड क्रं.५ अंतर्गत परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे स्ट्रिट लाईट फेज वायर ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) क) वार्ड क्रं.३१,३२,३३ व ३५ अंतर्गत सिध्दार्थ नगर, बौध्द वाडा, इकबाल कॉलनी, शांती नगर तसेच मेहरुण युनिट परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे स्ट्रिट लाईट फेज वायर ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) कामी प्रस्तुत कामाची ई-निविदा सुचना क्रं.११४६ दुसऱ्यांदा प्रसिध्द करुन दर मागविण्यात आले. सदर निविदेत एकच ई-निविदा प्राप्त झाल्याने शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२दि.२७/०९/२०१८ मधिल परिच्छेद क्र.४.३ नुसार कार्यवाही करणेत येवुन दरबाबतचा लिफाफा उघडण्यात आला. सदर निविदेत मक्तेदार यांनी ९.९९% जास्त चे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना दरा बाबत वाटाघाटी दर विश्लेषण कामी हजर राहण्याबाबत कळविण्यात आले त्या अनुषंगाने मक्तेदार हजर राहुन निविदेत भरलेल्या दरांमध्ये म्हणजे अंदाजदरापेक्षा ९.९९% जास्ती भरलेले दरामध्ये १.७४% दर कमी करुन फक्त ८.२५% जास्त दराने करण्यास तयार आहे असे लेखी पत्र दिलेले आहे.

प्रस्तुत काम हे महावितरण कंपनी मर्या.कंपनीच्या सुपर व्हिजन स्किम अंतर्गत करण्यात येत असुन कामाचे अंदाजपत्रक हे महावितरण कंपनी मर्या.कंपनीच्या जुन्या दरानुसार तथा सन २०१७-१८ च्या दरानुसार आहे. महावितरण कंपनी मर्या.कंपनीच्या नविन दरानुसार तथा सन २०१८-१९ च्या दरानुसार कामाची अंदापत्रकीय किंमत हि निविदा अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा १५.५०% ने जास्त आहे. मक्तेदाराने वाटाघाटी अंती प्रस्तुत काम ८.२५% जास्त दराने करण्याची तयारी दर्शविलेली असुन या दरानुसार येणारा अपेक्षित खर्च रक्कम रु.५४,८६,८५२/- मात्र आहे परंतु हा अपेखित खर्च महावितरण कंपनी मर्या.नविन दरानुसार सन २०१८-१९ चे दरानुसार येणाऱ्या अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ६.२५% ने कमी आहे. हि बाब विचारात घेता मक्तेदाराचे दर वाजवी व योग्य असल्याने मक्तेदाराने निविदेत भरलेले दर वाटाघाटी अंतीचे ८.२५% जास्त दर स्विकारणेस व या कामी येणाऱ्या पर्यायी एकुण रक्कम रु. ५४,८६,८५२/- मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करणेत येत आहे. तसेच प्रशासकीय मान्यता मिळाण्यानुसार रक्कम रु.५०,६८,६८५/- मात्र खर्च विशेष निधितुन व उर्वरित रक्कम रु.४,१८,६६७/- मात्र खर्च मनपा फंडातुन करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय/आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- ०८** **प्रतिकुल मते :- ००** **तटस्थ :- ०३**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

मा.सभापती :- सभा संपली नगरसचिव राष्ट्रगीत सुरु करावे.

नगरसचिव :- सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, राष्ट्रगीतासाठी सर्वांनी उभे राहावे.

राष्ट्रगीता नंतर येणे प्रमाणे सभेचे कामकाज संपन्न झाले.

Municipal Corporation Of the City Of Jalgaon
जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

Bmarutle
सभापती
स्थायी समिती
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

सदरील सभेचे कार्यवृत्त
ठराव क्रमांक १६१
दि. ११/०५/२०१९ अन्वये मंजुर
करण्यात आलेले असे.

Bmarutle
सभापती
स्थायी समिती
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.